**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २२ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **ऐतिहासिक भारत-न्यूझीलंड मुक्त व्यापार करार वाटाघाटी पूर्ण, पुढील पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार दुप्पट होणार.**
2. **राज्याचे माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती.**
3. **भारतीय जनता पार्टीच हा पहिल्या पसंतीचा पक्ष असल्याचं निवडणुकीत स्पष्ट झाल्याचं मुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांचं नागपुरात प्रतिपादन.**
4. **विदर्भात थंडीची लाट, ८.४ अंश सेल्सिअस सह नागपूर ठरले सर्वात शीत.**

---------------------------------------

**मुक्त व्यापार करार**

ऐतिहासिक भारत-न्यूझीलंड मुक्त व्यापार करार यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे पंतप्रधान क्रिस्टोफर लक्सन यांनी आज ही घोषणा केली. यासंदर्भात पंतप्रधान मोदी यांनी लक्सन यांच्याशी, दूरध्वनीवरुन संवाद साधला. हा करार द्विपक्षीय आर्थिक संबंध लक्षणीयरीत्या दृढ करेल, बाजारपेठेत प्रवेश सुलभ करेल, गुंतवणुकीला चालना देईल आणि दोन्ही देशांमधलं सामरिक सहकार्य मजबूत करेल, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. मुक्त व्यापार करारामुळे मिळालेल्या मजबूत आणि विश्वासार्ह पायाच्या आधारावर, दोन्ही पंतप्रधानांनी पुढील पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करण्याचा तसंच पुढील १५ वर्षांत न्यूझीलंडकडून भारतात २० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक होण्याचा विश्वास व्यक्त केला. न्यूझीलंडबरोबरचा मुक्त व्यापार करार हिंद प्रशांत महासागर क्षेत्रातल्या भारताच्या भूमिकेला पोषक ठरेल असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी म्हटलं आहे. विविध देशांबरोबर परस्परपूरक संबंध वेगाने दृढ होत असल्याचं या करारावरुन दिसतं असं ते आज नवी दिल्लीत पत्रकारपरिषदेत म्हणाले....

***(होल्ड बाईट- केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल २६ सेकंद)***

***This is the 7th free trade agreement. All of them were developed economies, with the economies with significantly larger per capita incomes than India, demonstrating that we are expanding trade relations rapidly with countries who compliment the Indian economy rather than Compete with India.***

भारताचं आंतरराष्ट्रीय व्यापारातलं वाढतं वर्चस्वही या करारामुळे स्पष्ट होतं असं त्यांनी सांगितलं.

-----------------------------------------

**शक्ती पाठ्यवृत्ती**

राष्ट्रीय महिला आयोगानं, तरुण संशोधकांसाठी, शक्ती पाठ्यवृत्तीची घोषणा केली आहे. महिलांच्या प्रश्नांशी संबंधित धोरणांमध्ये सकारात्मक बदल घडवण्याच्या दृष्टीने संशोधन करू इच्छिणाऱ्या, २१ ते ३० वर्षे वयोगटातल्या, भारतीय नागरिकांना ही पाठ्यवृत्ती दिली जाईल. ही पाठ्यवृत्ती सहा महिन्यांसाठी असून, त्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत आवेदन करता येईल, असं आयोगानं म्हटलं आहे.

-----------------------------------------

**माणिकराव कोकाटे**

महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला, सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली आहे. या प्रकरणी, सरन्यायाधीश न्यायमूर्ती, सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं महाराष्ट्र सरकारला नोटीसही बजावली आहे. विधानसभेच्या सदस्यत्वाचा निर्णय येईपर्यंतच ही स्थगिती राहणार असून, कोकाटे यांना कोणतंही लाभाचं पद स्वीकारण्यावर बंदी घालण्यात आल्याचं, न्यायालयानं स्पष्ट केलं आहे. १९९५च्या, सरकारी गृहनिर्माण योजनेशी संबंधित फसवणुकी प्रकरणी कोकाटे यांना दोषी मानून दंडाधिकाऱ्यांनी दिलेली दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा नाशिक सत्र न्यायालयानं गेल्या मंगळवारी कायम ठेवली होती. प्रथम दर्शनी पुराव्यांवरून या प्रकरणात कोकाटे यांचा सहभाग असल्याचं आढळल्यामुळे उच्च न्यायालयाने त्यांच्या शिक्षेला स्थगिती द्यायला नकार दिला होता.

-----------------------------------------

**डॉ. मोहन भागवत**

चंद्रपुरात टाटा समूहाच्या सहकार्याने उभारलेल्या अत्याधुनिक पंडित दीनदयाल कॅन्सर हॉस्पिटलचे आज लोकार्पण करण्यात आले. रा.स्व.संघाचे सरसंघचालक,

डॉ.मोहन भागवत यांच्या हस्ते, सुमारे 300 कोटी रुपये खर्चून, मध्य भारतातील कर्करोगावर उपचार करणारे नवीन केंद्र सुरू झाले. भागवत यांनी सांगितले की, शिक्षण आणि आरोग्य सर्वांसाठी उपलब्ध असले पाहिजेत आणि ते लोकांच्या आवाक्यातील असावे असं ते म्हणाले -

***(होल्ड बाईट - सरसंघचालक डॉ.मोहन भागवत २२ सेकंद)***

***दोन आवश्यकता ह्या सर्व माणसांच्या आवश्यकता आहे एक शिक्षण दुसरं आरोग्य ह्या सर्वांच्या आवश्यकता असल्यामुळे त्या सर्वांना मिळाल्या पाहिजे जर सर्वांना त्या आवश्यकताची पूर्ती होणार साधन मिळायचं असेल तर ते एका ठिकणी असून चालणार नाही लोकांपर्यंत पोहचल पाहिजे आणि त्या लोकांच्या आटोक्यातलं असल पाहिजे त्यांना परवडणार असलं पाहिजे.***

नागपुरातील सुविधांप्रमाणेच आता चंद्रपुरातही रुग्णालयात कर्करुग्णांवर उपचार होणार आहेत, ज्यामुळे देशातील रुग्णसेवेचे विकेंद्रीकरण साधले जाईल.

------------------------------------------

**बदली**

पुण्याचे गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांची वर्ध्याच्या पोलीस अधीक्षक पदी बदली झाली असून, वर्ध्याचे पोलीस अधीक्षक, अनुराग जैन यांची, नागपूरच्या नागरी हक्क संरक्षण पोलीस अधीक्षकपदी बदली झाली आहे.

------------------------------------------

**मुख्यमंत्री**

नुकताच झालेल्या नगरपंचायत नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की भारतीय जनता पार्टीच हा क्रमांक एकचा पक्ष आहे असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री  चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज  मुख्यमंत्री शासकीय निवासस्थान असलेल्या रामगिरी, येथे नागपूर जिल्ह्यातील नवनियुक्त नगराध्यक्ष आणि नगरसेवकांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला यावेळी आयोजित पत्रकार परिषदेला ते संबोधित करत होते. या निवडणुकीमध्ये भाजपने 2017 मध्ये नगरसेवकांची जी संख्या पंधराशे होती ती दुपटीने वाढवली असून या निवडणुकीत 3,000 च्या वर नगरसेवक भाजपचे निवडून आले आहेत, असं फडणवीस म्हणाले

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ३४ सेकंद)***

***महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये भाजपने कसून  नवीन रेकॉर्ड तयार केलेला आहे. तो म्हणजे नगरसेवक निवडून आणण्याचा मागच्या निवडणुकीमध्ये भाजपचे 2017 साली आपणच एक नंबर पक्ष होतो पण आपले 1500 नगरसेवक निवडून आले होते. यावेळी जवळपास तीन हजाराच्यावर नगरसेवक दुपटीपेक्षा जास्त नगरसेवक  हे भाजपचे निवडून आले आहेत आणि सहा पक्ष इतक्या आघाड्या, अपक्ष असं सगळं असताना एकूण नगरसेवकांच्या 48 टक्के एकट्या भाजपचे नगरसेवक महाराष्ट्रामध्ये निवडून आलेले आहेत.***

नागपूर जिल्ह्यात 27 पैकी 22 नगराध्यक्ष हे भाजपचे असून या सर्व सत्तावीस शहरांना देखील आपण मॉडेल शहर म्हणून विकसित करणार असल्याचा निर्धार त्यांनी यावेळी बोलून दाखवला.नागपूर जिल्ह्यातील सावनेर रामटेक जिल्हा हा काँग्रेस मुक्त केला तर कामठी शहरात नगरपंचायत स्थापना पासून पहिल्यांदाच कमळ फुलले असे अनेक विक्रम या निवडणुकांनी केले असे देखील फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. तत्पूर्वी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपूरच्या मुख्यमंत्री शासकीय निवासस्थान असलेल्या रामगिरी, येथे नागपूर जिल्ह्यातील नवनियुक्त नगराध्यक्ष आणि नगरसेवकांची भेट घेतली.

-----------------------------------------

**हर्षवर्धन सपकाळ**

राज्यातील २८८ नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीत, अत्यंत विपरित परिस्थितीत काँग्रेस पक्षाने विचारधारेच्या ताकदीवर लढा दिला. कोणतीही आर्थिक रसद नसताना, केवळ लोकशाही मूल्यांवर ठाम विश्वास ठेवून, सत्ताधा-यांच्या धनशक्ती विरोधात संघर्ष केला.  काँग्रेस कार्यकर्त्यांनी घेतलेल्या मेहनतीच्या बळावर या निवडणुकांत काँग्रेसचे ४१ नगराध्यक्ष आणि १,००६ नगरसेवक राज्यातील मतदारांनी निवडून दिले. या निकालावरून पैशांपेक्षा विश्वास मोठा असतो आणि सत्तेपेक्षा विचार महत्त्वाचा असतो, हे पुन्हा दिसून आले असं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे.

-----------------------------------------

**उमेदवारी अर्ज**

नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी उद्यापासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होत असून, ३० डिसेंबरपर्यंत अर्ज स्वीकारले जाईल. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार, १५ जानेवारी २०२६ रोजी, मतदान

होणार असून, १६ जानेवारीला मतमोजणी होईल. महानगरपालिकेच्या ३८ प्रभागांतील १५१ जागांसाठी ही निवडणूक होणार असून, त्यापैकी ७६ जागा महिलांसाठी राखीव आहेत. उमेदवारी अर्जांची छाननी ३१ डिसेंबरला, माघारीची अंतिम मुदत दोन जानेवारीला तर अंतिम उमेदवार यादी आणि निवडणूक चिन्ह वाटप तीन जानेवारी रोजी होणार आहे.

-----------------------------------------

**भंडारा मतदान गोंधळ**

भंडारा नगर परिषद निवडणुकीतील, प्रभाग क्रमांक तीनमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट उमेदवार, करुणा राऊत यांचं नाव ई.व्ही.एम.वर नसल्यानं, मतमोजणी वेळी गोंधळ उडाला. या प्रकरणी निवडणूक विभागाकडे तक्रार दाखल करण्यात आली असून, सात कर्मचाऱ्यांना निलंबित, तर दोन अधिकाऱ्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई केली जाईल, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली असून, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष, चरण वाघमारे यांनी कठोर कारवाईची मागणी केली आहे.

-----------------------------------------

**हवामान**

विदर्भातल्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये थंडीची लाट कायम असून आज नागपुरात, आठ पूर्णांक चार अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. नागपूर जिल्हा विदर्भात सर्वात गार ठरला असून, नागपूर पाठोपाठ वर्धा इथं नऊ पूर्णांक दोन, यवतमाळ नऊ पूर्णांक सहा तर भंडारा नऊ पूर्णांक सात अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये तापमान नऊ सेल्सिअस ते बारा अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

-----------------------------------------

**स्मृति मानधना**

विशाखापट्टणम इथं श्रीलंके विरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात स्मृती मानधनानं महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४,००० धावा पूर्ण करून नवा विक्रम केला. केवळ ३,२२७ चेंडूत हा टप्पा गाठत ती ही कामगिरी करणारी पहिली भारतीय फलंदाज ठरली असून, न्यूझीलंडच्या सुझी बेट्सचा वेगवान ४,००० धावांचा विक्रमही तिनं मोडला. २५ धावा करत, बाद होईपर्यंत स्मृतीच्या एकूण टी-२० धावा ४,००६ झाल्यात.

-----------------------------------------